**नगरपरिषद कर्मचाऱ्यांच्या वेतनातून कपात होणारी भविष्य निर्वाह निधीची रक्कम एकत्रित ठेवून योग्य गुंतवणूक करुन कर्मचाऱ्यांना वेळेत व्याज व रक्कम प्रदान करण्याबाबत.**

नगरपरिषद प्रशासन संचालनालय
क्र.नपप्रस/कक्ष-७लोआ/कामठीनप/मोहम्मदरनजीर/भनिनिरक्कम/२००९
शासकिय परिवहन सेवा इमारत, ३रा मजला,
सर पोचखानवाला मार्ग, वरळी,
मुंबई - ४०० ०३०.
दिनांक :- २५/५/२००९.

## : परिपत्रक :-

कामठी नगरपरिषदेतील एका प्रकरणी मा.उप लोक आयुक्त यांनी भविष्य निर्वाह निधीच्या रकमेवर नियमानुसार व्याज देण्याबाबत सुनिश्चित आदेश देण्याबाबत मा.लोक आयुक्त व उप लोक आयुक्त अधिनियम, १९७१ च्या कलम १२ (१) नुसार सक्षम प्राधिकारी यांना शिफारस केली आहे. त्यानुसार मा.उप लोक आयुक्त / लोक आयुक्त यांच्या शिफारशींच्या अनुषंगाने शासन नगर विकास विभाग यांनी त्यांचे पत्र क्र.एमयुएन-२००९/२१४/०९/नवि-१८, दि.२१/४/२००९ अन्वये प्रकरणी अहवाल सादर करण्याबाबत या संचालनालयास कळविले आहे.

०२. उपरोक्त प्रकरणी खालीलप्रमाणे निर्देश देण्यात येत आहेत. नगरपरिषद कर्मचाऱ्यांच्या वेतनातून कपात होणाऱ्या त्या-त्या खात्यात नियमित जमा होते व आवश्यकतेनुसार संबंधीत खात्यात व्याजही जमा करणे ही नगरपरिषदेची जबाबदारी असल्याचे यापूर्वी आपणास कळविण्यात आलेले आहे. तसेच सर्व नगरपरिषदांना त्यांच्या कर्मचाऱ्यांची भविष्य निर्वाह निधीची रक्कम एकत्र ठेवावी व एकत्रित निधीतून आवश्यक रक्कम गुंतवणूक करुन त्याद्वारे मिळणारे व्याज संबंधीत वैयक्तिक कर्मचाऱ्यांच्या खात्यात जमा होईल या दृष्टीने कार्यवाही करावा. जिल्हा प्रकल्प अधिकारी यांनी याबाबत वेळोवेळी ही बाब तपासून त्यावर सर्वंकष नियंत्रण ठेवावे.

मा.आयुक्त तथा संचालक यांच्या मान्यतेने.

(दिलीप पायगुडे)
उप संचालक
नगरपरिषद प्रशासन संचालनालय, मुंबई.

प्रत :-

माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी :-

१) मुख्याधिकारी, नगरपरिषद (सर्व).
२) जिल्हाधिकारी (सर्व).
३) विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक, नगर परिषद प्रशासन (सर्व).
४) उपमुख्य लेखा परिक्षक (वरीष्ठ), विभागीय कार्यालय (सर्व).

माहितीस्तव :-

५) कक्ष अधिकारी, नगर विकास विभाग यांचे पत्र क्र.एमयुएन-२००९/२१४/०९/नवि-१८, दि.२१/४/२००९ च्या अनुषंगाने.

C: Kamathi-Mohammad Rafiq Nazir-Ret.doc